RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष १२, अंक ४५ (४)] मंगळवार, एप्रिल ७, २०२६/चैत्र १७, शके १९४८ [पृष्ठे १३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक १६३**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग

गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ९ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१, दिनांक ७ एप्रिल, २०२६.

**अधिसूचना**

**भारताचे संविधान.**

क्रमांक एमईडीडी-५०२३(१)/८६/२०२५-एमएमडी(वैसेवा-४)११९६१०६.— भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकाद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि याबाबतीत यापूर्वी काढलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख हे अधिक्रमित करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आस्थापनेवरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यामधील दंतशास्त्र विभागातील प्राध्यापक दंतशास्त्र (गट अ) (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र (गट अ) (राजपत्रित), सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट ब) (राजपत्रित) या पदांच्या सेवाप्रवेशांचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहे :—

१. या नियमांस, शासनाच्या वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या आस्थापनेवरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यामधील दंतशास्त्र विभागातील प्राध्यापक दंतशास्त्र (गट अ) (राजपत्रित), सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र (गट अ) (राजपत्रित), सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट ब) (राजपत्रित) (सेवाप्रवेश) नियम, २०२६, असे म्हणावे.

२. या नियमांत, संदर्भानुसार दुसरा अर्थ, आवश्यक नसेल तर,—

(क) "नियुक्ती प्राधिकारी" याचा अर्थ,—

(एक) गट -अ या पदाकरिता माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हे नियुक्ती प्राधिकारी असतील;

(दोन) गट-ब या पदाकरिता संबंधित विभागाचे माननीय मंत्री हे नियुक्ती प्राधिकारी असतील;

असा आहे;

(ख) "सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट-ब)" याचा अर्थ, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दंतशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक असा आहे;

(ग) "सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र (गट-अ)" याचा अर्थ, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दंतशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक असा आहे;

(घ) "आयोग" याचा अर्थ, महाराष्ट्र लोकसेवा आयोग असा आहे;

(ङ) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाचा वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग, असा आहे;

(च) "संचालनालय" याचा अर्थ, वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, असा आहे;

(छ) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(ज) "पदोन्नतीसाठी पात्रता" याचा अर्थ, शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने, वेळोवेळी काढलेले नियम, शासन निर्णय किंवा आदेश यांद्वारे पदोन्नतीसाठी विनिर्दिष्ट केलेल्या अटी व शर्तीनुसार असलेली पदोन्नतीची पात्रता, असा आहे;

(झ) "दंतशल्यचिकित्सा पदव्युत्तर पदवी (एम.डी.एस)" याचा अर्थ, दंतशल्यचिकित्सा विषयातील पदव्युत्तर पदवी, असा आहे;

(ञ) "राष्ट्रीय वैद्यकीय आयोग" याचा अर्थ, राष्ट्रीय वैद्यकीय आयोग अधिनियम, २०१९ (२०१९ चा ३०) याच्या कलम ३ द्वारे स्थापन केलेला राष्ट्रीय वैद्यकीय आयोग, असा आहे;

(ट) "प्राध्यापक दंतशास्त्र (गट-अ)" याचा अर्थ, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील दंतशास्त्र विभागातील प्राध्यापक, असा आहे;

(ठ) "मान्यताप्राप्त दंत महाविद्यालय" याचा अर्थ, राष्ट्रीय दंत आयोगाद्वारे किंवा भारत सरकारने राष्ट्रीय दंत आयोगाऐवजी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही समकक्ष प्राधिकृत मंडळाद्वारे मान्यता दिलेले दंत महाविद्यालय , असा आहे;

(ड) "मान्यताप्राप्त वैद्यकीय महाविद्यालय" याचा अर्थ, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाद्वारे किंवा भारत सरकारने राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाऐवजी नियुक्त केलेल्या इतर कोणत्याही समकक्ष प्राधिकृत मंडळाद्वारे मान्यता दिलेले वैद्यकीय महाविद्यालय , असा आहे;

(ढ) "अनुसूची-एक" याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेली अनुसूची-एक, असा आहे;

(ण) "अनुसूची-दोन" याचा अर्थ, या नियमांसोबत जोडलेली अनुसूची-दोन, असा आहे;

**३.** प्राध्यापक दंतशास्त्र,(गट-अ) पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र (गट-अ) किंवा अनुसूची -एक मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही दंत ज्ञानशाखेतील सहयोगी प्राध्यापक, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय (गट-अ) हे पद आणि अनुसूची -दोन च्या अनुक्रमांक १ च्या नोंदी समोरील, अनुक्रमे, स्तंभ ३ व ४ मध्ये, नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशानाद्वारे, पुढील निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून करण्यात येईल :—

**(एक) वयोमर्यादा.—**

(क) किमान वयोमर्यादा.— उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण केलेले.

(दोन) कमाल वयोमर्यादा.- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गांतील नसलेल्या व्यक्तींसाठी पन्नास वर्षे पूर्ण असलेले व राखीव प्रवर्गांच्या व्यक्तींसाठी पंचावन्न वर्षे वय पूर्ण असलेलेः

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा आणखी पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अगोदरच शासकीय सेवेत काम करीत असलेल्या मागास वर्गातील उमेदवारांना एकतर शासकीय सेवेतील कर्मचारी म्हणून किंवा मागास वर्गातील कर्मचारी म्हणून वयोमर्यादेत शिथिलतेचा लाभ मिळू शकेल.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.–.**

यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन मधील अनुक्रमांक १ च्या नोंदी समोरील स्तंभ ३ मध्ये नमूद केलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण करणारी व्यक्ती.

**(तीन) अनुभव**.– यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन च्या अनुक्रमांक १ च्या नोंदी समोरील स्तंभ ४ मध्ये नमूद केलेला किमान अनुभव धारण करणारी व्यक्ती.

४. सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र,(गट-अ) पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट-ब) किंवा अनुसूची -एक मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही दंतशास्त्र ज्ञानशाखेतील सहायक प्राध्यापक, शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय (गट-ब) हे पद धारण करणाऱ्या आणि अनुसूची -दोनच्या अनुक्रमांक २ च्या समोरील नोंदी, अनुक्रमे, स्तंभ ३ व ४ मध्ये, नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशानाद्वारे, जे पुढील निकष पूर्ण करीत आहेत अशा उमेदवारांमधून करण्यात येईल :—

**(एक) वयोमर्यादा.–**

(क) किमान वयोमर्यादा.- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण केलेले.

(दोन) कमाल वयोमर्यादा.- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गांतील नसलेल्या व्यक्तींसाठी पंचेचाळीस वर्षे पूर्ण असलेले व राखीव प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी पन्नास वर्षे वय पूर्ण असलेलेः

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा आणखी पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अगोदरच शासकीय सेवेत काम करीत असलेल्या मागास वर्गातील उमेदवारांना एकतर शासकीय सेवेतील कर्मचारी म्हणून किंवा मागास वर्गातील कर्मचारी म्हणून वयोमर्यादेत शिथिलतेचा लाभ मिळू शकेल.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.–**

यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन मधील अनुक्रमांक २ च्या नोंदी समोरील स्तंभ ३ मध्ये नमूद केलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण करणारी व्यक्ती.

**(तीन) अनुभव.–** यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन च्या अनुक्रमांक २ नोंदी समोरील स्तंभ ४ मध्ये नमूद केलेला किमान अनुभव धारण करणारी व्यक्ती.

५. सहायक प्राध्यापक दंतशास्त्र, (गट-ब) पदावरील नियुक्ती एकतर,—

(क) दंतशल्यचिकित्सक (गट-ब) हे पद धारण करणाऱ्या आणि अनुसूची -दोन मधील अनुक्रमांक ३ च्या नोंदी समोरील, अनुक्रमे, स्तंभ ३ व ४ मध्ये, नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेच्या आधारे, पदोन्नतीसाठी पात्र असणाऱ्या योग्य व्यक्तीच्या पदोन्नतीने करण्यात येईल; किंवा

(ख) नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेच्या निकालाच्या आधारे, शिफारस केलेल्या उमेदवारांमधून नामनिर्देशानाद्वारे, जे पुढील निकष पूर्ण करीत आहेत अशा उमेदवारांमधून करण्यात येईलः-

**(एक) वयोमर्यादा.–**

(क) किमान वयोमर्यादा.- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्षे पूर्ण केलेले.

(दोन) कमाल वयोमर्यादा.- उक्त पदाच्या भरतीसाठी जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास राखीव प्रवर्गातील नसलेल्या व्यक्तींसाठी चाळीस वर्षे पूर्ण असलेले व राखीव प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी पंचेचाळीस वर्षे वय पूर्ण असलेलेः

परंतु, अगोदरच शासकीय सेवेत असलेल्या उमेदवारांसाठी वयोमर्यादा आणखी पाच वर्षांनी शिथिल करण्यात येईल :

परंतु आणखी असे की, अगोदरच शासकीय सेवेत काम करीत असलेल्या मागास वर्गातील उमेदवारांना एकतर शासकीय सेवेतील कर्मचारी म्हणून किंवा मागास वर्गातील कर्मचारी म्हणून वयोमर्यादेत शिथिलतेचा लाभ मिळू शकेल.

**(दोन) किमान शैक्षणिक अर्हता.–**

यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन मधील अनुक्रमांक ४ च्या नोंदी समोरील स्तंभ ३ मध्ये नमूद केलेली किमान शैक्षणिक अर्हता धारण करणारी व्यक्ती.

**(तीन) अनुभव.–** यासोबत जोडलेल्या अनुसूची -दोन मधील अनुक्रमांक ४ च्या नोंदी समोरील स्तंभ ४ मध्ये नमूद केलेला किमान अनुभव धारण करणारी व्यक्ती.

**६.** (१) नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्त्या, भरावयाच्या मंजूर पदांच्या एकूण संख्येच्या, अनुक्रमे, ५०:५० या प्रमाणात पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करण्यात येतील.

(२) नियम ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवरील नियुक्ती, भरावयाच्या मंजूर पदांच्या एकूण संख्येच्या, अनुक्रमे, १५:८५ या प्रमाणात पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.

परंतु, पदोन्नतीद्वारे नियुक्ती करण्याकरिता योग्य व्यक्ती उपलब्ध न झाल्यास, नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने, त्या विशिष्ट नियुक्ती वर्षासाठी पदोन्नतीद्वारे व नामनिर्देशनाद्वारे करावयाच्या नियुक्तीच्या प्रमाणात शिथिलता आणण्यात येऊ शकेल.

**७** नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीचा परिवीक्षा कालावधी दोन वर्षांचा असेल. सक्षम प्राधिकाऱ्यास योग्य वाटल्यास परिविक्षा कालावधी कमाल एक वर्षापर्यंत वाढविता येऊ शकेल. ती व्यक्ती, शासनाच्या परिवीक्षा धोरणानुसार परिवीक्षा कालावधी विहित कालमर्यादेत समाधानकारकरीत्या पूर्ण करील अन्यथा तिची सेवा समाप्त होण्यास ती पात्र असेल.

**८.** (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदांवर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी केलेल्या नियमानुसार, हिंदी व मराठी भाषा परीक्षा उत्तीर्ण करेल.

(२) नियम ३,४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, अगोदरच मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण नसेल किंवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून तिला सूट देण्यात आलेली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण करील. ती व्यक्ती, या परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**९.** (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने नियुक्त करावयाची व्यक्ती, उक्त पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, अगोदरच, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, त्याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी केलेल्या नियमानुसार विहित केलेले संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करील.

(२) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेल्या व्यक्तीने, तिला संगणक हाताळणी प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट देण्यात आली नसेल तर, ती, याबाबतीत, शासनाने, वेळोवेळी विहित केलेले असे संगणक हाताळणी प्रमाणपत्र, नियुक्तीनंतर विहित कालमर्यादेत धारण करील, अशी व्यक्ती, असे प्रमाणपत्र धारण करीपर्यंत, वार्षिक वेतनवाढीसाठी किंवा पुढील पदोन्नतीच्या पदावरील पदोन्नतीसाठी पात्र असणार नाही.

**१०.** (१) नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती, महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ याच्या तरतुदींनुसार किंवा याबाबत, शासनाने, वेळोवेळी केलेले अन्य कोणतेही नियम, काढलेले आदेश किंवा कोणतेही संलेख यानुसार लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करील.

(२) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करण्याच्या दिनांकास, दोनपेक्षा अधिक अपत्ये असणारी व्यक्ती, शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी अपात्र असेल.

(३) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर तिला, नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असल्याचे सिद्ध झाले तर, ती व्यक्ती, शासकीय सेवेतील उक्त पदावर कायम राहण्यास अपात्र असेल.

**११.** नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे किंवा पदोन्नतीद्वारे नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

**१२.** नियम ३, ४ किंवा ५ मध्ये नमूद केलेल्या पदावर निवड केलेल्या व्यक्तीने दंतवैद्य अधिनियम, १९४८, (१९४८ चा १६) अन्वये भारतीय दंतवैद्यक परिषद किंवा महाराष्ट्र दंतवैद्यक परिषद, मुंबई यांचेकडे नोंदणी करून घेणे आवश्यक आहे, अशी नोंदणी न केल्यास, त्यास उक्त पदावर नियुक्ती देण्यापूर्वी नोंदणी करून घेणे बंधनकारक असेल.

**१३.** या पदावर नियुक्त केलेली व्यक्ती, आवश्यक असल्यास, भारत सरकारकडून, वेळोवेळी, निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे, चार वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीकरिता (अशा उमेदवारांच्या प्रशिक्षणाचा कालावधीधरून) भारतात कोठेही किंवा भारताबाहेर कोठेही भारताच्या कोणत्याही संरक्षण सेवेत किंवा भारताच्या संरक्षणाशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही पदावर सेवा करण्यास पात्र असेल :

परंतु, अशी व्यक्ती तिची नियुक्ती झाल्याच्या दिनांकापासून दहा वर्षे समाप्त झाल्यानंतर आणि सर्वसाधारणपणे तिने वयाची पंचावन्न वर्षे पूर्ण केल्यावर, उपरोक्तप्रमाणे सेवा करण्याची आवश्यकता नसेल.

**१४.** अनुसूची -दोन मध्ये नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व अनुभव, राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाद्वारे किंवा भारत सरकारने स्थापन केलेल्या त्याच्या समकक्ष संस्थेद्वारे, अशा शैक्षणिक अर्हतेमध्ये व अनुभवामध्ये, यथास्थिति, मान्यता दिल्याच्या किंवा मान्यता रद्द केल्याच्या अधीन राहून, वेळोवेळी, सुधारित केले जातील.

शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, राज्य शासनाच्या वतीने शासन आदेशाद्वारे निश्चित केलेल्या अटी व शर्ती संबंधित व्यक्तीस यापुढेही लागू असतील.

## अनुसूची-एक

(नियम ३, ४ व ५ पहा)

| अ.क्र. | दंतशल्यचिकित्सा संबंधित विषय |
|---|---|
| १. | कृत्रिमदंतशास्त्र |
| २. | दंतशल्यशास्त्र |
| ३. | मुखशल्यचिकित्साशास्त्र |
| ४. | मुखरोगनिदान व क्ष-किरणशास्त्र |
| ५. | दंतपरिवेष्टनशास्त्र |
| ६. | दंतव्यंगोपचारशास्त्र |
| ७. | दंतविकृती व अणुजीवशास्त्र |
| ८. | बालदंतशास्त्र |
| ९. | सामाजिक दंतशास्त्र |

## अनुसूची-दोन

(नियम ३, ४ व ५ पहा)

| अ.क्र. (१) | पद (२) | अर्हता (३) | अनुभव (४) |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक दंतशास्त्र (गट-अ) | एक) भारत सरकारद्वारे मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची दंतशास्त्र चिकित्सेतील स्नातक पदवीसह अनुसूची-एक मध्ये नमूद केलेली दंतशास्त्र चिकित्सेच्या कोणत्याही विषयाची पदव्युत्तर पदवी.<br>दोन) सहयोगी प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर किमान दोन शोधनिबंध प्रसिद्ध झालेले असावेत आणि पहिल्या तीन लेखकांमध्ये नाव असावे;<br>तीन) नियुक्तीच्या दोन वर्षांच्या आत, आयोगाने निर्धारित केलेल्या संस्थांमधून वैद्यकीय शिक्षणातील पायाभूत अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल; आणि<br>चार) आयोगाने निर्धारित केलेल्या संस्थेमधून जैववैद्यकीय संशोधनामध्ये पायाभूत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. | अ)मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थेमधील तीन वर्षांपेक्षा कमी नसेल इतका दंतशास्त्र विभागातील सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र या पदाचा अनुभव, किंवा<br>ब) मान्यताप्राप्त दंतशास्त्र महाविद्यालयात किमान चार वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या सहयोगी प्राध्यापक म्हणून सेवेचा अनुभव. |
| २ | सहयोगी प्राध्यापक दंतशास्त्र (गट-अ) | एक) भारत सरकारद्वारे मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची दंतशास्त्र चिकित्सेतील स्नातक पदवीसह अनुसूची-एक मध्ये नमूद केलेली दंतशास्त्र चिकित्सेच्या कोणत्याही विषयाची पदव्युत्तर पदवी<br>दोन) सहायक प्राध्यापक म्हणून नियुक्ती झाल्यानंतर किमान दोन शोधनिबंध प्रसिद्ध झालेले असावेत आणि पहिल्या तीन लेखकांमध्ये नाव असावे;<br>तीन) नियुक्तीच्या दोन वर्षांच्या आत, आयोगाने निर्धारित केलेल्या संस्थांमधून वैद्यकीय शिक्षणातील पायाभूत अभ्यासक्रम पूर्ण करणे आवश्यक असेल; आणि<br>चार) आयोगाने निर्धारित केलेल्या संस्थेमधून जैववैद्यकीय संशोधनामध्ये पायाभूत अभ्यासक्रम पूर्ण केलेला असावा. | अ)मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थेमधील चार वर्षांपेक्षा कमी नसेल इतका दंतशास्त्र विभागातील सहायक प्राध्यापक दंतशास्त्र या पदाचा अनुभव किंवा<br>ब) मान्यताप्राप्त दंतशास्त्र महाविद्यालयात किमान पाच वर्षांपेक्षा कमी नसेल इतक्या सहयोगी प्राध्यापक म्हणून सेवेचा अनुभव |
| ३ | सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट-ब) (पदोन्नतीद्वारे) | एक) भारत सरकारद्वारे मान्यताप्राप्त भारतीय विद्यापीठाची दंतशास्त्र चिकित्सेमधील स्नातक पदवीसह अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या दंतशास्त्र चिकित्सेची कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी. | शासकीय दंतशास्त्र महाविद्यालय आणि रुग्णालय किंवा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय यामधील तीन वर्षांपेक्षा कमी नाही इतक्या कालावधीचा दंतशास्त्र चिकित्सक म्हणून अनुभव. |

| अ.क्र. (१) | पद (२) | अर्हता (३) | अनुभव (४) |
|---|---|---|---|
| ४ | सहायक प्राध्यापक दंतशास्त्र (गट-ब) (नामनिर्देशनाद्वारे) | एक) भारत सरकारद्वारे मान्यता प्राप्त भारतीय विद्यापीठाची दंतशास्त्र चिकित्सेमधील स्नातक पदवीसह अनुसूची-एक मध्ये नमूद केलेल्या दंतशास्त्र चिकित्सेची कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी. | दंतशल्य चिकित्सेचे पदव्युत्तर पदवी एमडीएस धारण केल्यानंतर मान्यताप्राप्त दंत अथवा वैद्यकीय महाविद्यालयातील वरिष्ठ निवासी किंवा नोंदणी अधिकारी किंवा पाठ निर्देशक किंवा अधिव्याख्याता किंवा दंतशल्यचिकित्सक म्हणून किमान एक वर्षाचा अनुभव.<br>**टीप.**—सहायक प्राध्यापक म्हणून असलेला एक वर्षाचा अनुभव हा वरिष्ठ निवासी म्हणून एक वर्षाच्या अनुभवाच्या समतुल्य समजण्यात येईल. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**श्वेतांबरी खडे,**
शासनाचे उप सचिव.

## MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT

Gokuldas Tejpal Hospital Campus, 9th Floor, Lokmanya Tilak Marg,
Mumbai 400 001, dated 7th April, 2026.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No. MEDD-5023(1)/86/2025-MMD(Vais-4)/ 1196106.— In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Professor Dentistry (Group-A) (Gazetted), Associate Professor Dentistry (Group-A) (Gazetted) and Assistant Professor Dentistry (Group- B) (Gazetted) in the Department of Dentistry in the Government Medical College and Hospital on the establishment of Directorate of Medical Education and Research, under the administrative control of the Medical Education and Drugs Department of Government of Maharashtra, namely :-

1. These rules may be called the Professor Dentistry (Group-A) (Gazetted), Associate Professor Dentistry (Group-A) (Gazetted) and Assistant Professor Dentistry (Group- B) (Gazetted) in the Department of Dentistry in the Government Medical College and Hospital on the establishment of Directorate of Medical Education and Research under the administrative control of the Medical Education and Drugs Department (Recruitment) Rules, 2026.

2. In these rules, unless the context requires otherwise,—

(*a*) "Appointing Authority" means,—

(*i*) the Hon'ble Chief Minister, State of Maharashtra who shall be the Appointing Authority for the post of Group-A;

(*ii*) the Hon'ble Minister of the concerned Department who shall be the Appointing Authority for the post of Group-B;

(*b*) "Assistant Professor Dentistry (Group-B)" means a Assistant Professor in the Department of Dentistry in the Government Medical College and Hospital under the administrative control of the Directorate of Medical Education and Research;

(*c*) "Associate Professor, Dentistry, (Group-A)" means a Associate Professor in the Department of Dentistry in the Government Medical College and Hospital under the administrative control of the Directorate of Medical Education and Research;

(*d*) "Commission" means the Maharashtra Public Service Commission;

(*e*) "Department" means the Department of Medical Education and Drugs Department of the Government of Maharashtra;

(*f*) "Directorate" means the Directorate of Medical Education and Research, under the administrative control of Medical Education and Drugs Department;

(*g*) "Government" means the Government of Maharashtra;

(*h*) "eligibility for promotion" means eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified for promotion by rules, Government Resolution, or orders issued by the General Administration Department from time to time;

(*i*) "Master of Dental Surgery (M.D.S)" means post graduate degree in dental surgery;

(*j*) "National Medical Commission" means the National Medical Commission established by section 3 of the National Medical Commission Act, 2019 (30 of 2019);

(*k*) "Professor Dentistry (Group-A)" means a Professor in the Department of Dentistry in the Government Medical College and Hospital under the administrative control of the Directorate of Medical Education and Research;

(*l*) "Recognized Dental College" means a Dental College recognized by the National Dental Commission or any other equivalent authorized body appointed by Government of India, in place of the National Dental Commission;

(*m*) "Recognized Medical College" means a Medical College recognized by the National Medical Commission or any other equivalent authorized body appointed by Government of India, in place of the National Medical Commission;

(*n*) "Schedule-I" means the Schedule-I appended to these rules;

(*o*) "Schedule-II" means the Schedule-II appended to these rules.

3. Appointment to the post of Professor Dentistry (Group-A) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Associate Professor Dentistry (Group-A) or Associate Professor, Government Dental College and Hospital (Group-A) in any dental discipline mentioned in Schedule-I and possessing educational qualification and experience mentioned in columns 3 and 4, respectively, against entry at serial number 1 of Schedule-II; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, with the approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely :—

(*i*) *Age Limit.—*

(*a*) *Lower Age Limit.–* Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) *Upper Age Limit.–* Fifty years of age completed for the persons not belonging to reserved categories and fifty- five years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post:

Provided that, the age limit for candidates who are already in government service shall be relaxed for further five years:

Provided further that, the backward class candidates who are already working in the government service can avail relaxation of age limit either for the government service employees or for backward class employees.

(*ii*) *Minimum Educational Qualifications.–* A person holding a minimum educational qualification mentioned in column 3 against entry at serial no.1 of the Schedule-II attached herewith.

(*iii*) *Experience.–* A person holding a minimum experience mentioned in column 4 against entry at serial no. 1 of the Schedule-II attached herewith.

4. Appointment to the post of Associate Professor Dentistry (Group-A) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion, on the basis of seniority, from amongst the persons holding the post of Assistant Professor Dentistry (Group-B) or Assistant Professor, Government Dental College and Hospital (Group-B) in any dental discipline mentioned in Schedule-I and possessing educational qualification and experience in columns 3 and 4 respectively against entry at serial number 2 of Schedule-II; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, with the approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely :—

(i) *Age Limit.–*

(*a*) *Lower Age Limit.–* Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) *Upper Age Limit.*— Forty-five years of age completed for the persons not belonging to reserved categories and fifty years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post:

Provided that, the age limit for candidates who are already in government service shall be relaxed for further five years:

Provided further that, the backward class candidates who are already working in the government service can avail relaxation of age limit either for the government service employees or for backward class employees.

(*ii*) *Minimum Educational Qualifications.*– A person holding a minimum educational qualification mentioned in column 3 against entry at serial no. 2 of the Schedule-II attached herewith.

(*iii*) *Experience.*– A person holding a minimum experience mentioned in column 4 against entry at serial number 2 of Schedule-II attached herewith.

5. Appointment to the Post of Assistant Professor Dentistry (Group-B) shall be made either,—

(*a*) by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Dental Surgeon (Group – B) and possessing educational qualification and experience in columns 3 and 4, respectively, against entry at serial number 3 of Schedule-II; or

(*b*) by nomination from amongst the candidates recommended by the Commission on the basis of the result of the competitive examination conducted by the Commission, with approval of the Appointing Authority, who fulfills the following criteria, namely:-

(*i*) *Age Limit.*–

(*a*) *Lower Age Limit.*– Eighteen years of age completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) *Upper Age Limit.*– Forty years of age completed for the persons not belonging to reserved categories and forty five years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post :

Provided that, the age limit for candidates who are already in government service shall be relaxed for further five years :

Provided further that, the backward class candidates who are already working in the government service can avail relaxation of age limit either for the government service employees or for backward class employees.

(*ii*) *Minimum Educational Qualifications.*– A person holding a minimum educational qualification mentioned in column 3 against entry at serial no. 4 of the Schedule-II attached herewith.

(*iii*) *Experience.*– A person holding a minimum experience mentioned in column 4 against entry at serial No. 4 of the Schedule-II attached herewith.

6 (*1*). Appointments to the posts mentioned in rules 3 and 4 by promotion and nomination shall be made in the ratio of 50:50 respectively, for the total number of sanctioned posts to be filled.

6 (*2*). Appointment to the posts mentioned in rules 5 by promotion and by nomination shall be made in the ratio 15:85 respectively, for the total number of sanctioned posts to be filled;

Provided that, if the suitable person for appointment by promotion is not available, the ratio of appointment by promotion and by nomination may be relaxed for that particular appointment year with the approval of Appointing Authority.

7. A Person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by nomination shall be on probation for a period of two years. The probation period may be extended maximum up to one year at the discretion of the Competent Authority. A person shall be completed the probation period satisfactorily

within the stipulated period as per the probation policy of the Government otherwise his services shall be liable to be terminated.

8(1). A person appointed to the post mentioned in the rule 3, 4 or 5 by promotion shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, unless he has already passed or had been exempted from passing those examinations before getting promoted to the said post.

8(2). A person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed the said examinations or has been exempted from passing those examination. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passed those examinations.

9(1). A person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by promotion shall possess certificate of Computer Operations prescribed by rules or orders issued in that behalf by the Government, from time to time, unless he already possesses such certificate has been exempted there from, before getting promoted to the said post.

9(2). A person appointed to the post mentioned in rule 3, 4 or 5 by nomination shall possess a certificate of computer operation prescribed by Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses such certificate.

10(1). A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 3, 4 or 5 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

10(2). A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

10(3). After appointment of a person in the Government service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government service.

11. A person appointed to the post mentioned in rules 3, 4 or 5 by nomination or promotion shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

12. A person selected to the post mentioned in rule 3, 4 or 5 are required to get registered their professional Qualification with Indian Dental Council or Maharashtra Dental Council, Mumbai under the Dental Act, 1948 (16 of 1948), if not so registered, he must be registered before the appointment on the said posts.

13. A person appointed on the post, if so required, be liable to serve in any Defence services of India or in post connected with the Defence of India anywhere in or outside India for a period of not less than four years (including the period spent on training on such candidates) as may be determined from time to time by the Government of India :

Provided that such person shall not be required to serve as aforesaid after expiry of ten years from the date of his appointment and ordinarily after he has attended the age of Fifty-Five years.

14. Educational qualification and experience mentioned in Schedule- II shall stand amended in accordance with the recognition or de-recognition, as the case may be, of such educational qualification and experience by National Medical Commission or equivalent body established by Government of India, from time to time.

After appointment in government service, the terms and conditions fixed by the government order on behalf of the State Government will continue to be applicable to the concerned.

*Schedule* – I

(*See* rules 3, 4 and 5)

| Sr. No. | Subjects of Dental Surgery |
|---|---|
| 1. | Prosthodontics and Crown and Bridge |
| 2. | Conservative Dentistry and Endodontics |
| 3. | Oral and Maxillofacial surgery |
| 4. | Oral Medicine and Radiology |
| 5. | Periodontology |
| 6. | Orthodontics and Dentofacial Orthopedics |
| 7. | Oral and Maxillofacial Pathology and Oral Microbiology |
| 8. | Pediatric Dentistry |
| 9. | Public Health Dentistry |

*Schedule* – II

(*See* rules 3, 4 and 5)

| Sr. No. (1) | Post (2) | Qualification (3) | Experience (4) |
|---|---|---|---|
| 1 | Professor Dentistry (Group-A) | i) a Bachelor's Degree in Dental Surgery with Master in any subject of Dental Surgery mentioned in Schedule-I, from an Indian University recognized by the Government of India.<br><br>ii) have published at least two research publications after appointment as Associate Professor and must be amongst first three authors;<br><br>iii) shall be required to undergo the Basic Course in Medical Education from institutions designated by the Commission within two years of appointment; and<br><br>iv) have completed the Basic Course in Biomedical Research from institution designated by the Commission. | (a) Associate Professor Dentistry in the department of Dentistry for not less than three years service in a recognised medical institution, or<br><br>(b) Associate Professor for not less than four years service in a recognised dental college. |

| Sr. No.<br>(1) | Post<br>(2) | Qualification<br>(3) | Experience<br>(4) |
|---|---|---|---|
| 2 | Associate Professor Dentistry (Group-A) | i) a Bachelor's Degree in Dental Surgery with Master in any subject of Dental Surgery mentioned in Schedule-I, from an Indian University recognized by the Government of India.<br>ii) have published at least two research publications after appointment as Assistant Professor and must be amongst first three authors;<br>iii) shall be required to undergo the Basic Course in Medical Education from institutions designated by the Commission within two years of appointment; and<br>iv) have completed the Basic Course in Biomedical Research from institution designated by the Commission. | (a) Assistant Professor Dentistry in the department of Dentistry for not less than four years in a recognised medical institution, or<br>(b) Associate Professor for not less than fivc years in a recognised dental college. |
| 3 | Assistant Professor Dentistry (Group-B) (by Promotion) | 1. a Bachelor's Degree in Dental Surgery with Master in any subject of Dental Surgery mentioned in Schedule-I, from an Indian University recognized by the Government of India. | Experience as Dental Surgeon in Government Dental College and Hospital or Government Medical College and Hospital for not less than three years. |
| 4 | Assistant Professor Dentistry (Group-B) (by Nomination) | 1. a Bachelor's Degree in Dental Surgery with Master in any subject of Dental Surgery mentioned in Schedule-I, from an Indian University recognized by the Government of India. | One year Experience as Senior Resident or Registrar or Tutor or Lecturer or Dental Surgeon in the concerned subject in a recognised medical or dental college after acquiring MDS degree.<br>*Note.*— One year experience as Assistant Professor shall be considered against one year experience as a Senior Resident. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

SHWETAMBARI KHADE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.